# सेंद्रियपद्धतीने आनंदनिर्मिती

**Harshal Khade**

**थोडा पाठिंबा आणि मार्गदर्शन मिळाले तर शेतकऱ्यांचे जीवन हे हवामान आणि बाजार व्यवस्था यातील बदलांशी जुळवून घेत शेतकरी त्यांचे जीवन बदलू शकतात. 'पितर साबर' याच्या उदाहरणाने आदिवासी शेतकरी 'डब्ल्यूओटीआर' यांच्या मदतीने शेतीची पद्धत बदलून उत्पन्नाची पातळी कशी वाढवू शकतो आणि त्याच्या भागामध्ये सर्वांना मार्गदर्शन करणारी व्यक्ती कशी बनवू शकतो हे स्पष्ट होते.**



पीट साबर हा रायगड डिस्ट्रिक्ट ओडिशा मधील गुनपूरच्या तारगिसिंग या खेड्यात राहणारा शेतकरी. लहान शेतकरी असून तो शेती व शेतीशी संबंधित कामांवर उपजीविकेसाठी अवलंबून आहे. त्याची पत्नी संजनीता साबर सोबत राहते. त्याच्या मालकीची सात एकर जमीन आहे त्यातील एक एकर जमीन खरीप हंगामात पावसाळी स्थितीत तो कसतो उरलेल्या सहा एकर जमीन ही गवताळ जमीन आहे जेथे तो जंगली काजू हे पीक घेतो जे खुप कमी उत्पन्न देते.

वर्षातून केवळ एकच पीक तो घेतो हिवाळ्यामध्ये त्याची जमीन पडीत ठेवतो. खरीपामध्ये धानाची लागवड केली जाते. आणि घरातील वापरासाठी ते धान्य ठेवले जाते. इतर घरगुती खर्चासाठी काजू विक्रीतून आलेली रक्कम वापरली जाते तसेच गावामध्ये तो मजुरी करतो. खेड्यातील इतर माणसांसोबत पीटर देखील चार ते सहा महिने राज्याबाहेर जातो जसे की अरुणाचल प्रदेश तामिळनाडू आणि पुणे येथे तो काम शोधण्यासाठी जातो.

**पुढाकार -** WOTR ने ऑगस्ट २०१८ मध्ये एक प्रकल्प राबविणे सुरू केले. गुनुपूर भागातील ११ खेड्यांमध्ये हा प्रकल्प सुरू झाला आदिवासी जमातींना उपजीविकेची साधने मिळावी व त्यात सुधारणा व्हावी या उद्देशाने हा प्रकल्प सुरू झाला बदलत्या हवामानाशी जुळवून घेत आपल्या क्षमता विकसित करीत लवचिकपणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश होता ब्रेड फॉर द वर्ल्ड यांनी या प्रकल्पाला पाठिंबा दिला. हवामानाला अनुकूल शेती हा एक घटक या प्रकल्पात राबविला गेला. हवामानानुकूल लवचिक शेती ही या प्रकल्पतील एक घटक आहे. या घटकाचे उद्दिष्ट असे आहे की, शाश्वत, लवचिक शेती प्रचलित करावी जसे की डउश्र - (पिकांच्या तीव्रतेची यंत्रणा) तसेच शेती करण्यामध्ये सुधारणा व्हाव्यात. सेंद्रिय शेतीस प्रोत्साहन, भाजीपाल्याचे उत्पादन घेण्यास प्रोत्साहन तसेच शेतीचा खर्च कमी व्हावा ही प्रमुख उद्दिष्टे या प्रकल्पमागे आहेत.

WOTR ने आयोजित केलेल्या प्रशिक्षण कार्यक्रमास पीटरने सहभाग घेतला, ज्यामध्ये बियाणांची निवड करण्यापासून ते पीक तयार होईपर्यंतच्या सर्व शेतीत सुधारणा करण्याचा तंत्राचा अंतर्भाव आहे. पीट सांगतो, ''पहिल्या प्रशिक्षणात आम्हाला बियाणे कसे निवडावे हे दाखवले गेले. बियाण्यांवरील प्रक्रिया व वाफे कसे तयार करायचे हे देखील दाखवले. दुसऱ्या प्रशिक्षणामध्ये डउश्र बाबत आम्हाला सांगितले. तसेच 'लाइन मेथड'चा वापर करून पुरेसा सूर्यप्रकाश आणि इतर पोषक तत्त्वांचा वापर करून जास्तीत जास्त पीक कसे घ्यावे ते सांगितले गेले. तिसऱ्या प्रशिक्षणात पोषण व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक दिले गेले व दशपर्णी अर्क, जीवामृत, नीमअस्त्र ही सेंद्रिय उत्पादने कशी तयार करावी याचेही प्रात्यक्षिक झाले. चवथ्या प्रशिक्षणात कापणी व कापणीनंतरचे व्यवस्थापन इत्यादी विषय हाताळले गेले.

**लवचिकतेची बांधणी -** प्रशिक्षणात शिकविलेल्या काही बाबी पीटरने उत्साहाने राबवल्या, ज्याचा त्याला फायदा झाला. वसुंधरा सेवक आणि थजढठ यांच्यातील सदस्यांची प्रशिक्षण आयोजनात महत्त्वाची भूमिका राहिली. प्रत्येक शेतकऱ्याला शेतीच्या हंगामात त्यांनी योग्य पद्धतीने हाताळले. थजढठ ने शेतकऱ्यांकडे प्रात्यक्षिकासाठी शेत असावे यासाठी सहकार्य केले. या शेतात सुचवलेल्या नव्या पद्धतींचा अवलंब करण्यात आला.

पारंपरिक पद्धतीने केलेल्या शेतीशी या जागेवर केलेल्या शेतीची तुलना केली गेली. दोन्हीमधील फरक स्पष्टच होता. डब्लूओटीआरने रोपांची वाढ, त्यांचा पूर्ण विकास, त्यांची सर्वोच्च स्थिती याबाबत सविस्तर नोंद ठेवण्यास मदत केली. पिकाचे मोजमाप कसे करावे ते दाखवले, पीटर म्हणतो ''पिकांची बारकाईने नोंद ठेवल्याने आम्हाला पिकांच्या प्रत्येक टप्प्याबाबत शिकायला मिळाले. निवडलेल्या जागेवरील पिकाबाबतच्या नोंदवलेल्या बाबींचे विष्लेशन करताना आम्हाला पारंपरिक पद्धतीपेक्षा नव्या पद्धतीतील फायदे जाणवले. उत्पादनाचे प्रमाण किती वाढले ते ध्यानात आले.''

मिळालेल्या मार्गदर्शनामुळे पीटरने २०१० मध्ये प्रथमच टोमॅटोचे पीक घेतले. पीक वाढविण्याचा पद्धतीचा त्याने अवलंब केला. एकेक रोप काड्यांना घट्ट बांधले. त्यामुळे ते ताठ राहिले. यामुळे रोपांना सरळ राहून जमिनीच्या संपर्कात राहणे टाळता आले. जमिनीच्या संपर्कामुळे फळे सडत असत.त्यामुळे होणारे नुकसान टाळता आले. पीटरने टोमॅटो विकून ८००० रुपये मिळवले. हे सेंद्रीय पद्धतीने पीक्विलेले टोमॅटो होते. ह्यात त्यांनी दशपर्णी अर्क, नीम अस्त्र आणि अमृत पाण्याचा उपयोग करून सेंद्रिय पद्धतीने वाढवलेले टोमॅटो रसायनमुक्त व चवदार आहेत.

२०२० या वर्षात संपूर्ण जिल्हा कोविड १९ या साथीने ग्रस्त झाला. पीटर त्याच्या शेतीतील कांदे आणि टोमॅटो ही उत्पादने विकण्यात मग्न होता. पीटरने २०२०-२१ च्या खरीप हंगामात एसआरआय म्हणजे राईस इंटेलिजेशनचा अवलंब केला. रब्बी हंगामात पीटरला ठिबक स्प्रिंकलर्सचा सेट देण्यात आला. कारण उपलब्ध असणारा पाणीपुरवठा पुरेसा नाही असे लक्षात आले. या सेटसाठी पीटरने २००० रुपये



भरले. त्या सेटचा उपयोग कसा करावा याचे प्रशिक्षण त्याला देण्यात आले. याचा परिणाम अत्यंत लक्षणीय झाला. त्याच्या प्रात्यक्षिकासाठीच्या शेतात २००० किलो असे प्रती एकर पीक आले व त्याच्या उर्वरित शेतात १७०० किलो प्रती एकर आले. प्रात्यक्षिकासाठीच्या शेतात १८ टक्के वाढ नोंदवली गेली. त्याने कांदे व टोमॅटोचे पीक घेण्यास सुरुवात केली व ८५३० रुपये नफा मिळवला. ज्या शेतकऱ्याने रब्बी हंगामात कधीच कोणतेही पीक घेतले नव्हते तो आता सरासरी ८००० रुपये या हंगामात मिळवित आहे.

पीटर आता सूर्यफुले, मका आणि भाजीपाला जसे मिरची, फुलकोबी, वांगी, कारले, दुधी भोपळा, कांदे यासारखी दुसरी पिके घेण्याचा विचार करीत आहे. पीटर सांगतो, ''मी आता रोजगारासाठी शहरात जाणार नाही. मी टोमॅटो, कांदे व इतर भाजीपाला यांचे पीक घेईन. मी माझ्या धानाच्या शेतात काम करेन. मोहाच्या बिया आणि काजू गोळा करेन. माझी सेंद्रिय द्रव्ये मी इतर शेतकऱ्यांना विकेन.''

जे शिकले ते इतरांना शिकविण्यावर पीटर विश्वास ठेवतो. ज्यांना शिकण्याची इच्छा आहे, त्यांना तो प्रात्यक्षिके देण्यास तयार असतो. त्याच्या परिचितांना, नातलगांना त्याने सेंद्रिय द्रव्ये तयार करण्याचे तंत्र शिकवले आहे. जवळपासच्या खेड्यातून ही द्रव्ये तयार करण्याच्या प्रशिक्षणाची फार मागणी आहे. त्यामुळे थजढठ ने पीटरला प्रशिक्षक म्हणून इतर आदिवासी खेड्यात जाण्यास सहकार्य केले. रोजगाराच्या शोधात शहरात जाणाऱ्या पीटरचे प्रशिक्षकामध्ये रूपांतर होणे ही

**Harshal Khade**
Communications Officer
Watershed Organisation Trust (WOTR)
The Forum, 2nd Floor
Pune - Satara Road, Padmavati Corner
above Ranka Jewellers, Pune - 411009
Maharashtra.
E-mail: harshal.khade@wotr.org.in

**मराठी अनुवाद : श्रीमती वनिता हिंगे**

***Source :*** *Building resilience organically, Leisa India, September, 2022*

**LEISA INDIA Language Editions**



**Kannada, Telugu, Tamil, Oriya, Hindi, Marathi and Punjabi**